नियमित खटला क्र. १५४/२०१९

फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०० अन्वये फिर्यादीची शपथेवर बयान

माझे नांव : रमेश जंगलुजी चमेले,
वय :५४ वर्षे व्यवसाय : आटाचक्की
रा. आजणी, ता. कामठी जि. नागपुर.

माझी गादा येथे ख.क्र. २८६/ब प्रमाणे शेत जमिन आहे. नंदलाल व गेंदलाल हे माझे भाउ आहेत. वरिल शेती ही आम्ही तीन्ही भावाची एकत्रित मालमत्ता आहे. सदरची शेती ही ६३ आर आहे. आमच्या शेतजमिनीला लागुन भगवान चमेले यांची शेत जमिन आहे. तो आमचा नातेवाईक असल्यामुळे त्याचे आमचे घरी त्याचे येणे जाणे होते. ऐकेदिवशी आरोपीने एक कागद आणला व त्याने त्याच्या शेतमोजणीसाठी आमची कागदावर सही घेतली. त्यानंतर दिनांक २६/१०/२०१८ रोजी रात्रीदरम्यान आरोपीने आमचे शेत जमिनीत तारेचे कुंपण करण्यास सुरुवात केली. आम्हाला दुस-या दिवशी सदरची बाब समजली. त्यानंतर आम्ही आरोपीस विचारणा केली असता आरोपीने आम्हाला शिवीगाळ केली व मारण्याची धमकी दिली. त्यानंतर आम्ही पोलीस ठाणे येथे जावुन तक्रार दिली. पोलीसांनी त्याला समज दिली. परंतु काहीही कार्यवाही केली नाही. त्यानंतर मी व माझी वहिनी लता नंदलाल चमेले ही दिनांक २७/०२/२०१९ रोजी शेतामध्ये गेली असता आरोपीने तिलासुद्धा शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. तिने देखिल तक्रार दाखल केली परंतु पोलीसांनी दखल घेतली नाही. त्यानंतर आम्ही नागपुर येथे पोलीस अधिक्षक यांचेकडे तक्रार दाखल केली. आरोपीने बोगस खरेदी करारनामा तयार केला होता. त्यावरदेखिल पोलीसांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. म्हणुन मी न्यायालयात तक्रार दाखल केली.

........................
साक्षीदाराची सही/अंगठा

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

दिनांक :२७/०२/२०२०

(ए.एस.गाडवे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कामठी